लोकमत

# नवे शैक्षणिक धोरण राबविण्यात आघाडीवर

## शिवाजी विद्यापीठ : एबीसी नोंदणीत वाढ

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शाळा-महाविद्यालयांमध्ये नवे शैक्षणिक धोरण राबविण्यासाठी सरकारकडून प्रयत्न केले जात असले तरी शिवाजी विद्यापीठाने मात्र २०२१-२२ च्या शैक्षणिक वर्षामध्येच या धोरणाची प्रभावीपणे अंमलबजावणी करत आघाडी घेतली आहे. नवीन शैक्षणिक धोरणात राबविण्यात येणाऱ्या अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट (एबीसी) योजनेत शिवाजी विद्यापीठाच्या १ लाख २६ हजार ११ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विद्यार्थी संख्येच्या तुलनेत अपेक्षेहून अधिक नोंदणी झाली आहे.

### विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती

शिवाजी विद्यापीठात डिसेंबरपासून पदवी-पदव्युत्तरमधील पारंपरिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षातील जवळपास ७५ हजार विद्यार्थ्यांनी एबीसीअंतर्गत खाते उघडले आहे. गतवर्षीपासूनच हे खाते उघडण्यास सुरुवात करण्यात आली होती. यासाठी विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती, प्रशिक्षणही दिले.

### काय आहे योजना?

एबीसीच्या संबंधित ॲपवर नोंदणी केल्यानंतर विद्यार्थ्यांची शैक्षणिक माहिती येथे स्टोअर होईल. ज्या विद्यार्थ्यांना काही कारणास्तव आपला अभ्यासक्रम मध्येच सोडावा लागला तर त्यांना पुन्हा सात वर्षांच्या आत कधीही पुढील शिक्षण सुरू करता येऊ शकते. एका विद्यापीठातून दुसऱ्या विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी जातानाही विद्यार्थ्याला एबीसीचा लाभ होणार आहे. महाविद्यालयीन शिक्षणाचे प्रथम वर्ष उत्तीर्ण झाल्यावर प्रमाणपत्र, द्वितीय वर्ष उत्तीर्ण झाल्यावर पदविका आणि तीन वर्षे किंवा अभ्यासक्रम पूर्ण केल्यावर पदवी प्रदान केली जाईल.

> शिवाजी विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरण २०२२ पासून राबविण्यास सुरुवात केली आहे. एबीसी योजनेतही विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी सर्वाधिक नोंदणी केली आहे.
>
> **- पी. एस. पाटील, प्र. कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ**

पुढारी

# विद्यापीठात मंगळवारी डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यान

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र अधिविभाग, विद्यार्थी विकास विभाग आणि नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय कीर्तीचे समाजशास्त्रज्ञ प्रा. डॉ. विलास संगवे स्मृती व्याख्यान मंगळवार (दि.६) रोजी सकाळी ११.३० वाजता मानव्यशास्त्र सभागृह इमारतीमध्ये आयोजित करण्यात आले आहे. 'शिवचरित्रातील काही वादस्थळे' याविषयावर डॉ. रमेश जाधव व्याख्यान देणार आहेत. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी असतील. प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, माजी समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. एस. एन. पवार प्रमुख उपस्थितीत असतील. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन प्रा. डॉ. प्रतिमा पवार, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. प्रल्हाद माने यांनी केले आहे.

पुण्यनगरी

# लोककल्याण हेच शिवरायांचे अंतिम ध्येय होते : डॉ. फाळके

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

लोककल्याणासाठी हिंदवी स्वराज्य हे शिवाजी महाराजांचे अंतिम ध्येय होते, असे प्रतिपादन पुण्याचे शिवचरित्राचे अभ्यासक डॉ. केदार फाळके यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ आणि श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ३५० व्या शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यानिमित्त राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या विशेष श्रमसंस्कार शिबिरातील शनिवारच्या पहिल्या व्याख्यानात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

यावेळी कुलपती महोदय नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य श्री सिद्धार्थ शिंदे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. स्वागत व प्रास्ताविक डॉ. टी. एम. चौगुले यांनी केले. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. के. एम. देसाई यांनी आभार मानले. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, श्री शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे चेअरमन मानसिंग बोंद्रे, प्राचार्य डॉ. आर. के. शानेदिवाण यांचे प्रोत्साहन मिळाले.

पुण्यनगरी

# 'दूरशिक्षण 'तर्फे ६ पर्यंत कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या राज्यशास्त्र विषयांतर्गत 'महाराष्ट्राची संकल्पना आणि लघु संशोधन प्रबंध सुलभ लेखन पद्धती' या विषयावर राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेचे आयोजन केले आहे. दि. ६ जूनपर्यंत दुपारी ३ ते ४ या वेळेत ही कार्यशाळा होणार आहे, अशी माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. यामध्ये ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, शारदाबाई पवार अध्यासन समन्वयक प्रा. डॉ. भारती पाटील, डॉ. शिवाजी मोटेगावकर, उपकुलसचिव डॉ. संजय कुबल व डॉ. वैशाली पवार विविध विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत. राज्यस्तरीय ऑनलाईन कार्यशाळेचा लाभ विद्यार्थी व अभ्यागतांनी गुगल मीट व वेबेक्स ॲपद्वारे घ्यावा, असे आवाहन प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी केले.

04 JUN 2023 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या उपक्रमात विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे

## डॉ. सुभाष कोंबडे यांचे आवाहन : मास कम्युनिकेशनच्या संसदपटू विद्यार्थ्यांचा सत्कार

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या विविध उपक्रमात सहभागी होऊन स्वतःचे व्यक्तिमत्व घडवावे, असे आवाहन मानसशास्त्र अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. सुभाष कोंबडे यांनी केले. राष्ट्रीय युवा संसदेत उत्कृष्ट संसदपटू ठरलेल्या मास कम्युनिकेशनची विद्यार्थिनी साईसिमरन घाशी हिचा व युवा संसदेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवणाऱ्या सचिन बनसोडे यांचा प्रा. कोंबडे यांच्या हस्ते सत्कार केला. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मास कम्युनिकेशनचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव होते. प्रा. कोंबडे म्हणाले, शिवाजी विद्यापीठात अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जातात. पत्रकारितेच्या विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला पाहिजे. विद्यापीठाच्या उपक्रमांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवली पाहिजे. यावेळी सुमेधा साळुंखे, प्रा. परशराम पवार, विद्यार्थी उपस्थित होते.

तरूण भारत

# बी.कॉम पेपरफुटीचा अहवाल प्राप्त

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मार्च–एप्रिल २०२३ उन्हाळी सत्रातील बी. कॉम सेमिस्टर सहाचा ॲडव्हान्स अकौंटन्सीचा पेपर नंबर चार एका महाविद्यालयात फुटला. यासंदर्भात नेमलेल्या चौकशी समितीने विद्यापीठातील परीक्षा विभागाकडे शनिवारी अहवाल सादर केला. हा अहवाल सोमवारी परीक्षा प्रमाद समितीसमोर सादर केला जाणार आहे. या समितीने अहवाल पाहून, चौकशी केल्यानंतरच पुढील कारवाई केली जाईल.

विद्यापीठ परीक्षा सुरळीत पार पडाव्यात म्हणून प्रत्येक एसआरपीडी सेंटरवर सीसीटीव्ही बसवले आहेत. २३ महाविद्यालयावर बैठे स्कॉड नेमले आहे. तर ९ महाविद्यालयावर परीक्षेच्या कामासाठी परीक्षा विभागातील कर्मचारी कार्यरत आहेत. तरीही कॉपीचे प्रकार घडतात ही सर्वस्वी प्राचार्यांची जबाबदारी असल्याची शिक्षण वर्तुळात चर्चा आहे. विद्यापीठातील परीक्षा विभागाकडे आलेला अहवाल, सीसीटीव्ही फुटेज पाहून परीक्षा प्रमाद समिती अंतिम निर्णय घेईल. त्यानुसार दोषींवर कडक कारवाई केली जाईल.

- **सोमवारी परीक्षा प्रमाद समितीसमोर सादर करून कारवाई करणार**
- **विद्यापीठ परीक्षा विभागाकडून कडक भूमिका**

### रिडक्शन कॉपीसाठी गर्दी

सुभाष रोडवरील एका कॉलेजवरील शुक्रवारी परीक्षेदरम्यान परिसरातील झेरॉक्स सेंटरवर रिडक्शन कॉपीसाठी गर्दी होती. परीक्षा विभागाच्या अधिकाऱ्यांनी परीक्षा सेंटर व झेरॉक्स सेंटरची तपासणी सुरू केल्यानंतर उपस्थितांची धांदल उडाली. अधिकाऱ्यांनी कॉलेज प्रशासनाला सक्त सूचना देत, सूचनांचे पालन न केल्यास कारवाई करणार असल्याचे सुनावले आहे.